**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष १२, अंक ९ (२)] शुक्रवार, मार्च १३, २०२६/फाल्गुन २२, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **१३ मार्च, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम **११६** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. XI OF 2026.**

A BILL

TO IMPLEMENT UNIFORM CIVIL CODE IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ११.**

**महाराष्ट्र राज्यात समान नागरी संहिता लागू करण्यासाठी विधेयक, २०२६.**

**ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्यासाठी समान नागरी संहिता लागू करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे दिलेली आहेत;

**आणि ज्याअर्थी,** विवाह, घटस्फोट, पोटगी, पालकत्व, दत्तक, वारसा व उत्तराधिकार यासंबंधी विविध वैयक्तिक कायद्यांमुळे निर्माण होणारी कायदेशीर असमानता, भेदभाव व गुंतागुंत दूर करण्याच्या उद्देशाने; स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, वैयक्तिक स्वातंत्र्य व कायद्यापुढे समानता या संविधानिक मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी; धार्मिक श्रद्धा, उपासना पद्धती व धार्मिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून, केवळ नागरी बाबींमध्ये एकसमान कायदेशीर चौकट निर्माण करणे आवश्यक झाले आहे,

**त्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात समान नागरी संहिता लागू करण्यासाठी भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्यावर्षी याद्वारे, पुढील प्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे.

संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती

**१.** (१) या अधिनियमास महाराष्ट्र समान नागरी संहिता विधेयक, २०२६ असे म्हणावे.

(२) तो, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनाकांस अंमलात येईल.

(३) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू राहील.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भांनुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(अ) "**विवाह**" म्हणजे कोणत्याही धर्म, पंथ, प्रथा किंवा कायद्यानुसार पार पडलेला विवाह;

(आ) "**घटस्फोट**" म्हणजे सक्षम न्यायालयाने दिलेला किंवा कायद्याने मान्य केलेला विवाह विच्छेद किंवा विवाह रद्द;

(इ) "**लिव्ह-इन संबंध**" म्हणजे विवाह न करता दोन प्रौढ व्यक्तींनी परस्पर संमतीने एकत्र राहणे;

(ई) "**नोंदणी प्राधिकरण**" म्हणजे राज्य शासनाने नियुक्त केलेला सक्षम अधिकारी;

(उ) "**वैयक्तिक अधिनियम**" म्हणजे धर्म, रूढी किंवा परंपरेवर आधारित नागरी अधिनियम;

अनुसूचित जमातींना सूट.

**३.** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३६६ (२५) व अनुच्छेद ३४२ अन्वये अधिसूचित केलेल्या अनुसूचित जमातींच्या सदस्यांवर हा अधिनियम लागू राहणार नाही. तथापि, राज्य शासन आवश्यक वाटल्यास, अधिसूचनेद्वारे या अधिनियमातील कोणतीही तरतूद अनुसूचित जमातींना लागू करण्याचा निर्णय घेऊ शकेल.

**४.** (१) महाराष्ट्र राज्यात हद्दीत या प्रत्येक विवाहाची नोंदणी अनिवार्य राहील.

(२) विवाह कोणत्याही धर्मपद्धतीने पार पडला असला तरी, त्याची नोंदणी अधिनियमात विहित कालावधीत करणे बंधनकारक राहील.

(३) नोंदणी न केल्यास, राज्य शासनाने नियमांद्वारे ठरविलेल्या दंडाची तरतूद लागू राहील.

विवाहासाठी समान अटी.

**५.** (१) वराचे वय किमान २१ वर्षे व वधूचे वय किमान १८ वर्षे पूर्ण झालेले असावे.

(२) विवाह परस्पर स्वेच्छेने व मुक्त संमतीने झालेला असावा.

(३) कोणत्याही परिस्थितीत बहुपत्नीत्व अथवा बहुपतित्वास मनाई राहील.

घटस्फोट व वैवाहिक वाद.

**६.** (१) घटस्फोटासाठी सर्व नागरिकांना एकसमान कायदेशीर आधार लागू राहतील.

(२) पोटगी, निर्वाहभत्ता, मुलांचा ताबा, पालकत्व व मालमत्ता वाटप याबाबत लिंगभेद न करता निर्णय दिला जाईल.

(३) या अधिनियमान्वये कौटुंबिक न्यायालयांना अधिकार राहतील.

लिव्ह-इन संबंध.

**७.** (१) लिव्ह-इन संबंधांची नोंदणी ऐच्छिक राहील.

(२) नोंदणीकृत लिव्ह-इन संबंधातून जन्मलेल्या बालकांना कायद्याने संपूर्ण संरक्षण व हक्क प्राप्त होतील.

(३)अल्पवयीन व्यक्तींमध्ये लिव्ह-इन संबंधास मनाई राहील.

८. (१) वारसा व उत्तराधिकाराबाबत सर्व नागरिकांसाठी एकसमान नियम लागू राहतील. वारसा व उत्तराधिकार

(२) मुलगा व मुलगी यांच्यात कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

(३) पती, पत्नी, संतती व पालकांचे हक्क समान राहतील.

(४) वसीयत (Testamentary Succession) बाबत **Indian Succession Act, 1925** मधील तरतुदी लागू राहतील.

९. हा अधिनियम कोणत्याही नागरिकाच्या धार्मिक श्रद्धा, उपासना पद्धती किंवा धार्मिक विधींमध्ये हस्तक्षेप करणार नाही.हा अधिनियम केवळ नागरी स्वरूपाच्या बाबींवर लागू राहील. धार्मिक स्वातंत्र्याचे संरक्षण

१०. (१) हा अधिनियम केंद्र किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही विद्यमान अधिनियमांना रद्द करणार नाही. विद्यमान अधिनियमांवर परिणाम (Effect on Existing Laws).

(२) तथापि, महाराष्ट्र राज्यात हा अधिनियम लागू असताना, खालील कायदे या अधिनियमाशी विसंगत असतील त्या मर्यादेत लागू राहणार नाहीत-

(क) Hindu Marriage Act, 1955

(ख) Hindu Succession Act, 1956

(ग) Hindu Minority and Guardianship Art, 1956

(घ) Hindu Adoption and Maintenance Act, 1956

(च) Muslim Personal Law (Shariat)Application Act, 1937

(छ) Indian Christian Marriage Act, 1872

(ज) Divorce Act, 1869

(झ) Parsi Marriage and Divorce Act, 1936

(३) फौजदारी कायदे, धार्मिक न्यास, वक्फ, मंदिर, चर्च किंवा धार्मिक संस्थांशी संबंधित कायद्यांवर या अधिनियमाचा कोणताही परिणाम होणार नाही.

११. या अधिनियमातील कोणतीही तरतूद केंद्र शासनाच्या विद्यमान अधिनियमांशी विसंगत ठरल्यास, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २५४ (२) नुसार, **राष्ट्रपतींच्या अधिसंमतीनंतरच** सदरहू अधिनियम अंमलात येईल. केंद्रीय अधिनियमांशी विसंगत व राष्ट्रपतीची अधिसंमती.

१२. (१) या अधिनियमाच्या अंमलबजावणीपूर्वी झालेल्या विवाह, घटस्फोट, वारसा किंवा त्यासंबंधी प्रलंबित प्रकरणांवर या अधिनियमाचा परिणाम होणार नाही. बचत व संक्रमण तरतूद (Saving& Transitional Provisions).

(२) प्रलंबित न्यायालयीन कार्यवाही पूर्ववत चालू राहील.

१३. (१) शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, सत्रासीन असताना, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने मांडण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, जर त्या नियमात

कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल, आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१४.** (१) जर या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरुप उद्‌भवेल त्याप्रमाणे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, करता येईलः

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

## उद्देश व कारणे

भारतीय संविधानातील अनुच्छेद ४४ नुसार, राज्याने नागरिकांसाठी एकसमान नागरी संहिता लागू करण्याचा प्रयत्न करावा, अशी मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे तथापि, सध्या विवाह, घटस्फोट, दत्तक, वारसा, उत्तराधिकार, मालमत्ता हक्क व कुटुंब विषयक बाबींमध्ये विविध धर्म, पंथ याकरिता वेगवेगळ्या अधिनियमांनुसार केलेल्या वेगवेगळ्या तरतुदी लागू आहेत. यामुळे समाजात कायदेशीर असमानता, संभ्रम व सामाजिक विसंगती निर्माण होत आहेत.

महाराष्ट्र राज्यातही विविध नागरी अधिनियमांच्या अंमलबजावणीत एकरूपतेचा अभाव दिसून येतो. विशेषतः महिलांचे हक्क, बालकांचे संरक्षण, वारसा व मालमत्तेतील समानता, तसेच विवाह व कौटुंबिक विवादांमधील न्यायप्रक्रियेत स्पष्टता व पारदर्शकता आवश्यक आहे. वेगवेगळ्या कायद्यांमुळे सामान्य नागरिकांना न्याय मिळवताना विलंब, खर्च आणि अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र राज्यासाठी एक समान, न्याय, धर्मनिरपेक्ष व संविधान-सुसंगत नागरी संहिता तयार करून, सर्व नागरिकांना समान अधिकार व कर्तव्ये प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

तसेच या अधिनियमाद्वारे लिंगसमता प्रस्थापित करणे, महिलांना व बालकांना कायदेशीर संरक्षण देणे, कौटुंबिक वादांचे जलद व सुलभ निराकरण करणे, तसेच समाजात सामाजिक समता व राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे परिणामी, नागरी अधिनियमांमध्ये सुसूत्रता निर्माण होऊन न्यायप्रक्रियेत पारदर्शकता वाढेल, नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ होईल आणि राज्यातील सामाजिक सुधारणांना चालना मिळेल हे अपेक्षित आहे.

म्हणून महाराष्ट्र समान नागरी संहिता अधिनियम, २०२६ हे अशासकीय विधेयक महाराष्ट्र विधानसभेत सादर करणे आवश्यक झाले आहे.

वरील उद्दिष्टये साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन,**
मुंबई**,**
दिनांकः २८ फेब्रुवारी, २०२६

**अतुल भातखळकर,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात, वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहे :-

**खंड १३.**—या खंडान्वये या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आले आहेत.

वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचा वरील प्रस्ताव हा सामान्य स्वरूपाचा आहे.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १३ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.